MHLA130003992018

**नियमित दिवाणी दावा क्र. ८७/२०१८**
**<u>आदेश निशाणी ६१ वर</u>**

**१.** अर्ज निशाणी क्र.६१ हा वादीने मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला ४ वर्ष २ महिने २३ दिवस विलंब माफ होउन मिळण्यासाठी दिला आहे. वादीतर्फे युक्तीवाद ऐकला.

**२.** वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. २ हे दि. ०६.०९.२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादीस दि.२६.११.२०२३ रोजी त्याबाबत माहिती मिळाली. वादी हे बाहेरगावी राहत असल्यामुळे मुदतीत मयताचे वारस अभिलेखावर आणणसाठी अर्ज करता आला नाही व दावा अबेट झाला आहे. दाव्याचा अंतीमत: आणि गुणवत्तेवर निकाल होण्यासाठी मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ करावा अशी विनंती केली आहे.

**४.** वादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

**३.** वादींतर्फे प्रस्तुत अर्जासोबत शपथपत्र दिले आहेत. अर्जांतील वर नमुद कारणांचा विचार करता मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी जाणिवपुर्वक विलंब केल्याचे दिसुन येत नाही. अश्या परीस्थितीत प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर येउन या दाव्यात गुणवत्तेवर निकाल होण्यासाठी त्यांना संधी देणे न्यायोचित होणार आहे. अर्जातील कारणांचा विचार केला असता वादीने सांगितलेले कारण संयुक्तीक वाटते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस पात्र आहेत. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी क्र.६१ मंजूर करण्यात येतो.
२. मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर आणणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.
३. अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

दिनांक ०४.०१.२०२५
रेणापूर

के.के.वाघमारे
**सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**रेणापूर**